N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** शाहदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0272 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/03/2026 10:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 17/10/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/10/2025

**Time From (वेळेपासून):** 14:14 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/03/2026 **Time (वेळ):** 09:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 010

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/03/2026 09:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय,शहादा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री विकास शिवाजी लोंढे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588029368

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिजीत गोवर्धन भावसार | | | 1. रा प्लाट नं 14 ब आदर्श नगर, शहादा ,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, विकास शिवाजी लोंढे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. मो.नं.7588029368.

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील 05 महीन्यापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 17/10/2025 रोजी तक्रारदार गंगाधर विष्णू बुधवंत, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शहादा जि. नंदुरबार, यांनी पो.ना. हेमंतकुमार महाले नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एक लोकसेवका विरुध्द तक्रार असल्या बाबत माहिती कळवुन शहादा येथे येवुन कारवाई करण्याबाबत विनंती केली.या बाबत मा. पोलीस उप अधीक्षक श्री. प्रशात भरते सा यांना माहिती दिली त्याप्रमाणे आम्ही तालुका कृशी अधिकारी, नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच 1) श्री मंदार वासुदेव पाटील, सहा.कृषी अधिकारी व 2) श्री नरेंद्र रोहिदास देसले, सहा. कृशी अधिकारी, नेम. तालुका कृशी अधिकारी, कार्यालय, नंदुरबार यांना पंच म्हणुन अॅन्टी करप्षन कार्यालय, नंदुरबार हे उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर आम्ही , पोना/ हेमंतकुमार महाले, पोना/ 356 सुभाश पावरा अषासंह खाजगी वाहनाने सापळा कारवाईकामी लागणारे सर्व साहित्यानिषी षहादा येथे पथकासह रवाना झालो दरम्यान असई/ विलास पाटील यांना षहादा येथील बायपास रोडवरील मिरा लॉन्स येथे मोकळ्या जागेत थांबण्यास सागितले त्यानंतर आम्ही नमुद ठिकाणी षहादा बायपास वरील मिरा लॉन्स जवळ पोहोचलो. तेथे तक्रारदार श्री. गंगाधर बुधवंत व असई/विलास पाटील हे थांबलेले होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांचे पुर्ण नाव, गाव, पत्ता व तक्रारीबाबत विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव गंगाधर विशणु बुधवंत, वय 40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत भादे, (पंचायत समिती कार्यालय, शहादा) ता. शहादा जि. नंदुरबार, मुळ रा.पांगरी, ता. जिंतुर, जि. परभणी असे सांगीतले. त्यानंतर आम्ही सापळा पथकातील सदस्यांची, दोन्ही पंचाची व तक्रारदार श्री गंगाधर बुधवंत अषांची आपआपसात ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगितली असता त्यांनी त्यांची तक्रार स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली ती खालीलप्रमाणे.

'' मी ग्रामपंचायत भादे येथे सन 2023 पासुन ग्रामपंचायत अधिकारी म्हणुन कार्यरत आहे. तसेच माझी पत्नी सौ.अरूणा, दोन मुले ओम आणि आरूष असे असुन ते माझ्या मुळ गावी पांगरी ता. जिंतुर, जि. परभणी येथे राहणेस आहे. दिनांक 12/08/2025 रोजी माझी अचानक तब्बेत अचानक बिघडल्याने मी वैदयकीय रजेवर गेलो होतो. मी रजेवरून हजर होण्यासाठी दिनांक 16/10/2025 शहादाकडे येत असतांना दुपारी पंचायत समिती कार्यालय, शहादा येथील क्लार्क भावसार नाना यांनी त्यांचे व्हॉट्सअॅपवरून मला माझे मोबाईल व्हॉट्सअॅपवर एक फोटो पाठविला तो मी उघडुन बघितला असता त्यात माझे प्रपत्र 1 ते 4 भरलेबाबतचे कवरींग लेटर असल्याचे दिसले. मी त्यांना कॉल केला असता, त्यांनी मला सांगितले की, तुमचे प्रपत्र 1 ते 4 भरून माझ्याकडे दिलेले आहेत. त्यावरून होणारी पुढील कारवाई टाळायची असेल तर मला येवुन भेटा असे सांगितले. त्यावर मी त्यांना षहादा येथे येत असल्याचे सांगितले. मी त्यांनी पाठविलेला फोटो पुन्हा बघीतला असता तेथे फोटो न दिसता व्चमदमक असा मेसेज दिसला. मी दिनांक 17/10/2025 रोजी सकाळी पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे कर्तव्यावर हजर झालो. व सकाळी पंचायत समिती कार्यालय, शहादा येथील क्लार्क श्री.भावसार नाना यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांना भेटलो. त्यांना 1 ते 4 प्रपत्राबाबत विचारणा केली असता त्यांना सांगितले की, साहेबांनी कोणत्या तरी कारणावरून 1 ते 4 प्रपत्र भरले असुन त्यावरून सदर प्रपत्र पुढे पाठविल्यास माझ्यावर कारवाई होवु शकते असे सांगितले. सदर प्रपत्रे पुढे न पाठविता कारवाई येथेच थांबवायची असल्यास गटविकास अधिकारी साहेबांना दोन लाख रूपये दयावे लागतील असे सांगितले. त्यावर मी त्यांना माझा मागील तीन पगार देखील झाला

नसल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी पैसे दिल्यानंतर वैदयकीय रजा कालावधीतील पगार काढुन देतो असे सांगितले. मी शहानिशा करण्यासाठी गटविकास अधिकारी सोनवणे सर यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, तुझ्या प्रकरणाबाबत मी भावसार नाना यांना सांगितले आहे त्याप्रमाणे करून दे. माझे फॉर्म 1 ते 4 चार भरून पुढची कारवाई न करण्यासाठी व मी वैदयकीय रजेवर असतांनाचा तीन महिन्याचा पगार काढुन देण्यासाठी दोन लाख रूपये दयावे लागतील असे क्लार्क भावसार नाना व गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे साहेब यांनी मागणी केलेली पैसे ही कुठलीही शासकीय फी नसुन लाचच आहे, याची मला खात्री झाल्याने मी माझे ओळखीचे अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील पोलीस हेमंतकुमार महाले, यांना संपर्क करून सदरची हकीकत सांगुन त्यांना आज दिनांक 17/10/2025 रोजी शहादा येथे बोलवले असल्याने आपण षहादा येथे येवुन संबधीत पैशांची मागणी करणारे क्लार्क भावसार नाना व गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे साहेब हे दोन लाख रूपयांची लाच मागणी करीत असल्याने त्यांचेवर कारवाई करण्याबाबत विनंती केल्याने आपण व आपला स्टाफ व दोन पंच असे आज दिनांक 17/10/2025 रोजी शहादा शहरातील बायपासवरील मिरा लॉन्स जवळ रस्त्याच्या कडेला जागेत आल्यावर मी आपण व दोन्ही पंचासमक्ष माझी तक्रार देत आहे. तरी माझे प्रपत्र 1 ते 4 चार भरून पुढची कारवाई न करण्यासाठी व माझे वैदयकीय रजेच्या कालावधीतील पगार काढुन देण्यासाठी दोन लाख रूपयांची लाच मागणी करणारे पंचायत समिती कार्यालय शहादा येथिल क्लर्क श्री.भावसार नाना व गटविकास अधिकारी श्री.एस. टी. सोनवणे साहेब यांचेवर आपण योग्य ती कारवाई करावी ही विनंती आहे." वैगरे मजकुरची तक्रार तक्रारदार श्री. बुधवंत यांनी लिहुन दिली व सदर तक्रारीवर तक्रारदार श्री.गंगाधर बुधवंत यांनी सही केल्यानंतर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवष्यक असल्याने आपले सूचनेवरुन पोना/हेमंतकुमार महाले यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी. 32 जी.बी.चे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड बाहेर काढून ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर नं 1 ची निवड करून दोन्ही पंच व मला दाखवून सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईबाबतच्या योग्य त्या सूचना दिल्या.

आमचे सुचनेवरून पोना/हेमंतकुमार महाले यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार श्री गंगाधर बुधवंत यांचे शर्टचे आतील बनियानला लेसच्या सहाय्याने अडकवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये फोल्डर नं. 1 ची निवड करून ते सुरु करुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कोणास दिसणार नाही, अषारितीने तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजुस टाकले. त्यानंतर तक्रारदार श्री बुधवंत व पंच नं. 1 श्री मंदार पाटील यांना तक्रारदार यांचे ताब्यातील चारचाकी खाजगी वाहन किया कंपनीची सोनेट क्रमांक एम.एच.22, ए.डब्ल्यू. 1797 हिचेने रवाना केले व परत षहादा बायपास वरील मिरा लॉन्स जवळ येण्या बाबत सुचना दिल्या. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. बुधवंत व पंच क्र. 1 मंदार पाटील असे मिरा लॉन्स जवळ आल्यावर, आमचे सुचनप्रमाणे पोना/हेमंतकुमार महाले यांनी तक्रारदार यांचे षर्टच्या आतील बनियानला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 मंदार पाटील यांना पंच नं.2 श्री.नरेंद्र देसले यांचेसमक्ष विचारले की,''आपणास व तक्रारदार अषांना पंचायत समिती शहादा येथील लोकसेवक क्लार्क भावसार नाना व गटविकास अधिकारी श्री. सोनवणे साहेब यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली?" असे विचारता पंच नं. 1 श्री मंदार पाटील यांनी सांगितले की,

'' मी व तक्रारदार असे पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे गेलो असता, येथे तक्रारदार बुधवंत हे एका टेबलासमोर बसलेले इसमाकडे गेले तेथे तक्रारदार व त्यांचेत कामासंदर्भात चर्चा सुरु झाली, चर्चे दरम्यान तक्रारदार बुधवंत यांनी त्यांनतर तक्रारदार श्री बुधवंत यांनी " तीन महिने पगार झाला नाही रजेवर आहे माझे 1 ते 4 भरले, मिटींगला येत नाही, खेडयावर जात नाय, रजेवर असतांना का हो असं, मला सांगा ना नेमकं असे' सांगितल्यावर सदर इसम 'नंतर निवांतात सांगु लोक बघतात 'असे सांगितल्यावर तक्रारदार श्री बुधवंत यांनी 'लवकर थोडं जरा' असे सांगितल्यावर लोकसेवक क्लार्क भावसार नाना यांनी "पगार बी करून देतो म्हणे, सर्व करून देतो दिड सांग "असे सांगितल्यावर तक्रारदार श्री बुधवंत "दिड लाख " असे विचारले असता लोकसेवक क्लार्क भावसार नाना यांनी "हो" असे सांगितले, त्यावेळी तक्रारदार श्री बुधवंत 'थोड कमी करायला लावा' असे सांगितल्यावर त्यावेळी लोकसेवक क्लार्क भावसार नाना यांनी 'हे फायनल सागितलं हे आता साहेबांनी अशी त्यांची चर्चा झाली' त्यानंतर लोकसेवक क्लार्क भावसार नाना यांनी 'आता तुम्ही किती वेळात येता' असे म्हटल्यावर तक्रारदार श्री बुधंवत 'साहेब जाण्याच्या अगोदर येईल आज' तेव्हा लोकसेवक क्लार्क भावसार नाना 'साहेब केव्हा पण निघुन जातात, दीड देणार ना, असे सांगितल्यावर तक्रारदार श्री बुधवंत यांनी नंतर दीड लाख देईन, आता 10 देईन असे

सांगितल्यावर सदर इसम यांनी 'आता कोणाषी चर्चा नाय करायची विस्तार अधिकारी नाय काय नाय, हा चार वाजेच्या आत या हा असे सांगितल्यावर तक्रारदार श्री बुधवंत 'हो हो साहेब हो म्हटले हे ना पण' त्यावेळी सदर इसम "हा, हो म्हटले साहेब" असे सांगितले त्यानंतर मी व तक्रारदार श्री बुधवंत असे ठरल्या ठिकाणी शहादा बायपास वरील मिरा लॉन्स जवळ आलो.'' बाबत हकीगत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार श्री गंगाधर बुधवंत व लोकसेवक क्लार्क भावसार यांचेतील डिजीटल व्हॅाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाशण हे पंच नं. 1 श्री मंदार पाटील व पंच नं. 2 श्री नरेंद्र देसले यांचे समक्ष खाजगी वाहनातच आम्ही सर्वानी ऐकले. त्यात क्लार्क भावसार यांनी तक्रारदार श्री.गंगाधर बुधवंत यांचेकडुन त्यांचे 1 ते 4 प्रपत्र भरून पुढची कारवाई न करण्यासाठी व वैदयकीय रजेच्या कालावधीतील पगार काढुन देण्यासाठी साहेबांसाठी म्हणजेच गटविकास अधिकारी सोनवणे यांचेसाठी दोन लाख रूपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती दिड लाख रूपये मागणी केल्याचे पंच साक्षीदारासमोर केलेल्या पडताळणीमध्ये स्पष्ट झाले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

सदर लाचेची रक्कम दिवाळीनंतर आणुन देणेबाबत तक्रारदार श्री. बुधवंत यांनी सांगीतल्याने व लोकसेवक क्लार्क भावसार यांनी पडताळणी दरम्यान तक्रारदार श्री. बुधवंत यांना सांगीतले की, गटविकास अधिकारी सोनवणे यांनी 'त्या माणसाला माझ्यासमोर नाही आणायचा, आला तर मोबाईल चेक करायचा' असे सांगितल्याने गोपनीयतेच्या दृश्टीने व लोकसेवक गटविकास अधिकारी सोनवणे यांना संषय येवु नये या कारणाने दिवाळी नंतरच लोकसेवक गटविकास अधिकारी सोनवणे यांची लाचेची पडताळणी करुन पुढील सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिवाळी सणानंतर दिनांक 12/11/2025, दिनांक 13/11/2025, दिनांक 14/11/2025, दिनांक 28/11/2025 रोजी आम्ही तक्रारदार श्री. बुधवंत यांना पुढील कारवाई करणेसाठी संपर्क केला असता, तक्रारदार यांनी त्यांच्या वडीलांचा अपघात झाल्यामुळे ते जेथलिया हॉस्पीटल, परभणी येथे अॅडमिट केले आहे, त्यांच्यासोबत घरातील कोणीच कर्ता व्यक्ती नसल्याने वडीलांसोबत दवाखान्यात थांबावे लागते. त्यामुळे लोकसेवक गटविकास अधिकारी एस. टी. सोनवणे यांची लाचेची पडताळणी करुन पुढील कार्यवाही करणेकरीता मी आता गावाहुन येवु शकत नाही बाबत सांगितले होते. त्यानंतर आम्ही तसेच पोना/हेमंतकुमार महाले यांनी तक्रारदार श्री. बुधवंत यांना तक्रारदार श्री. बुधवंत यांना वेळोवेळी मोबाईल फोनद्वारे संपर्क केला होता परंतु तक्रारदार यांनी मला व पोना/हेंतकुमार महाले यांना माझ्या वडीलांसोबत कोणीच नसल्याने येणे शक्य होणार नाही बाबत सांगीतले होते. त्यानंतर दिनांक 12/02/2026 रोजी आम्हाला तका्ररदार श्री. गंगाधर बुधवंत यांनी मोबाईलद्वारे संपर्क करून सांगीतले की, उदया दिनांक 13/02/2026 रोजी आपण शहादा येथे येवुन माझ्याकडून लाचेची मागणी करणारे लोकसेवक क्लार्क भावसार यांचेवर पुढील कारवाई करा, असे सांगितल्याने दि. 13/02/2026 रोजी पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे दि. 13/02/2026 रोजी आम्ही सापळा कारवाईकामी सर्व साहित्यानिशी शासकीय व खाजगी वाहनाने स्टाफसह शहादा येथे बायपास रोडवरील मिरा लॉन्स येथे पोहोचलो. आम्ही अगोदरच दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार तेथे हजर होते. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे शेती उत्पन्नाचे बचतीतुन 5,000/-रुपये त्यात 500/- रु. दराच्या 10 चलनी नोटा हजर केल्या. तेव्हा आम्ही लाचेच्या रकमेत 1,45,000/- रूपये कमी असल्याने लहान मुलांच्या खेळण्याच्या व हुबेहुब ख-या चलना सारख्या दिसणा-या 500/- रुपये दराच्या 290 डमी नोटा सामिल करुन नोटांचे एकत्रित बंडल तयार करुन त्यास पोना/सुभाष पावरा यांनी पंचांसमक्ष अॅंथासीन पावडर लावली व सदर नोटा पोना/सुभाष पावरा यांनी तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे खिषात ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोना/महाले यांनी तक्रारदार यांचे बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावले, त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 मंदार पाटील अशाना पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे तक्रारदार यांचे खाजगी वाहन किया कार क्र. एम.एच. 22 एडब्ल्यु 1797 हिचेने मिरा लॉन्स येथुन पाठविले व त्यांचे पाठोपाठ आम्ही व स्टाफ शासकीय व खाजगी वाहनाने पंचायत समिती कार्यालय शहादा येथे येऊन आजुबाजुस दबा धरुन बसलो होतो. तक्रारदार यांनी पंच नं 1 यांचेसोबत लोकसेवक क्लार्क भावसार यांची भेट घेतली व त्यांचे तक्रारीच्या अनुशंगाने क्लार्क भावसार यांचेषी चर्चा केली असता क्लार्क भावसार यांना पंच क्र. 1 मंदार पाटील यांच्या समक्ष तक्रारदार श्री. बुधवंत यांनी '1 ते 4 चा काय विशय आहे' असे विचारले असता, लोकसेवक क्लार्क भावसार यांनी 'संपल सगळ' असे सांगुन लाच घेण्यास टाळाटाळ केली. तसा सविस्तर पडताळणी पुर्व व सापळा स्थगिती पंचनामा क्र. 1 करण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक 15/02/2026 रोजी आम्हाला तका्ररदार श्री. गंगाधर बुधवंत यांनी मोबाईलद्वारे संपर्क करून सांगीतले की, उदया दिनांक 16/02/2026 रोजी मी लोकसेवक क्लर्क भावसार यांना पंचायत समिती शहादा येथे भेटणार आहे. तरी तुम्ही शहादा येथे येवुन लोकसेवक क्लार्क भावसार यांचेवर पुढील कारवाई करा बाबत सांगितल्याने दि. 16/02/2026 रोजी पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात

आले.

त्यानंतर दिनांक 16/02/2026 रोजी पुन्हा सापळा कारवाई आयोजीत केली व ठरल्याप्रमाणे शहादा येथील मिरा लॉन्स येथे शासकीय व खाजगी वाहनाने पोहोचलो. आम्ही तक्रारदार यांना यापुर्वी दिनांक 13/02/2026 रोजी परत केलेली लाचेची रक्कम सादर करण्यास सांगितले असता, तक्रारदार श्री. गंगाधर बुधवंत यांनी त्यांचेकडील खाकी पाकीटात ठेवलेले 5,000/- रुपये पाकीटातुन बाहेर काढले, त्यातील 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा आमचे व पंचासमक्ष हजर केल्या. तसेच आमचे ताब्यात असलेल्या अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडील 1,45,000/- रु. त्यात 500 रुपये दराच्या 290 डमी नोटा सामील करुन सदर नोटांचे बंडल तयार केले. सदर नोटांना आमचे सुचनेवरुन पोना/सुभाष पावरा यांनी पंचांसमक्ष अॅथ्रासीन पावडर लावून तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे खिशात ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोना/महाले यांनी तक्रारदार यांचे बनियानला व्हॉईस रेकॉर्डर लावले, त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 मंदार पाटील अशांना पंचायत समिती, कार्यालय शहादा येथे तक्रारदार यांचे खाजगी वाहन किया सोनेट कार क्र. एम.एच. 22 एडब्ल्यु 1797 हिचेने मिरा लॉन्स येथुन पाठविले व त्यांचे पाठोपाठ आम्ही व स्टाफ शासकीय व खाजगी वाहनाने पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे येऊन आजुबाजुस दबा धरुन बसलो होतो. तक्रारदार यांनी पंच नं 1 यांचे सोबत लोकसेवक क्लार्क भावसार यांची भेट घेतली व त्यांचे तक्रारीच्या अनुशंगाने चर्चा केली असता लोकसेवक क्लार्क भावसार यांनी तक्रारदार श्री. बुधवंत यांना 'पैशाचा विषयच नाही आहे सर जी , तुम्ही घडी घडी पैसे पैसे नका करु पैशाचा विषयच नाही आहे. आता लेटर आलेल आहे त्याच्या अनुशंगाने मी तुम्हाला अभिप्राय देणार पण त्यासाठी समीती नेमणार ती समीती सर्व चेक करेल तुम्ही ईथे दप्तर आणुन दाखववे लागेल त्याच्या नंतर होईल सर्व' असे सांगुन लाचेची रक्कम घेण्यास टाळाटाळ केल्याचे स्पष्ट झाले होते. तसा सविस्तर पडताळणी पुर्व व सापळा स्थगिती पंचनामा क्र. 2 करण्यात आला आहे. त्यांनतर तक्रारदार श्री. गंगाधर बुधवंत यांना पुढील कार्यवाही बाबत विचारपुस करता त्यांनी हकिकत सांगितली की, "माझे प्रपत्र 1 ते 4 फॉर्म भरुन पुढची कारवाई न करण्यासाठी व त्यांचे वैदयकीय रजेच्या कालावधीतील पगार काढुन देण्यासाठी 1,50,000/- रुपये लाच मागणी करणारे पंचायत समिती शहादा येथील लोकसेवक क्लार्क श्री. भावसार हे माझ्याकडुन मागणी केलेली लाचेची रक्कम 1,50,000/- रुपये आता स्विकारणार नाहीत व पुन्हा भविश्यात पैशाची मागणीदेखील करणार नाहीत, अशी माझी आता पुर्णपणे खात्री झालेली आहे. तरी लोकसेवक क्लार्क श्री. भावसार यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी" यांप्रमाणे हकिकत सांगून स्वहस्ताक्षरात जबाब लिहून दिला. सदर जबाब दोन्ही पंचांनी वाचून त्यावर दोन्ही पंच व आम्ही स्वाक्षरी केलेली आहे.

तरी दि.17/10/2025 रोजी 14.14 वा.पासून ते 15.04 वाजेचे दरम्यान केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक क्लार्क श्री. अभिजीत गोवर्धन भावसार, नेमणुक- पंचायत समिती, शहादा जि.नंदुरबार यांनी तक्रारदार श्री. गंगाधर बुधवंत, ग्राम पंचायत अधिकारी, नेमणुक पंचायत समिती, शहादा यांचे प्रपत्र 1 ते 4 फॉर्म भरुन पुढची कारवाई न करण्यासाठी व तक्रारदार यांचे वैदयकीय रजेच्या कालावधीतील पगार काढुन देण्यासाठी लोकसेवक क्लार्क अभिजित भावसार यांनी गटविकास अधिकारी सोनवणे यांचे नावाने प्रथम 2,00,000/- रुपये व तडजोडीअंती 1,50,000/- रुपये लाचेची रक्कम तक्रारदार श्री. गंगाधर बुधवंत यांचे कडे पंच साक्षीदारांसमक्ष मागणी केल्याचे निश्पन्न झाले आहे. म्हणून माझी लोकसेवक क्लार्क श्री. अभिजीत गोवर्धन भावसार, नेमणुक- पंचायत समिती, शहादा जि.नंदुरबार यांचे विरुध्द सरकातर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
HEMANTKUMAR PRABHAKAR PATIL(I (Inspector)) / PNMAH47488 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
शहादा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMANTKUMAR PRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH47488

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**